# तुकडोजी महाराजांना विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. विद्यापीठात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व प्र-कुलगुरू डी. टी. शिर्के यांच्या हस्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, आर. व्ही. गुरव, प्रल्हाद माने उपस्थित होते.

पुढारी

पर्यावरण

डॉ. व्ही. एन. शिंदे

# ओझोन थराचा धोका टळला!



**कोरोना आला. त्याने जगभर विनाश सुरू केला आणि त्याच्या भीतीने लॉकडाऊन झाले. सर्व कारखाने, उद्योगधंदेच नाही, तर वैयक्तिक वाहनांचा वापर अगदीच कमी झाला. वातावरणातील प्रदूषण कमी झाले आणि एका संकटाने दुसरे संकट दूर केले. प्रदूषण कमी झाल्यामुळे हे छिद्र भरले असल्याचे संशोधकांचे म्हणणे आहे.**

मागील वर्षाच्या नोव्हेंबरपासून जगात कोरोना या विषाणूची चर्चा सुरू झाली. या विषाणूने या वर्षाला व्यापून टाकायचे, असे ठरवलेले दिसते. चीनमधील वुहान या प्रांतात त्याच्या प्रसारास सुरुवात झाली. अनेकांना वाटले होते की, सार्ससारखा कोरोनाही थोडाफार त्रास देईल आणि जाईल. मात्र, पाहता पाहता त्याने सारे जग व्यापले आणि सर्वत्र कोरोना हा एकच चर्चेचा विषय बनला. जगातील अनेक संशोधक यावर लस शोधत आहेत. अजून तरी म्हणावे तसे यश मिळालेले दिसत नाही. आपण लवकरच या विषाणूवर लस शोधू. कोरोनावर मात करू, यात शंकाच नाही. हा लेख लिहीत असताना जगातील या आजाराने बाधितांची संख्या तीस लाखांवर पोहोचली आहे. मृतांचा आकडा सव्वादोन लाखांच्या टप्प्यावर गेला आहे. जगातील अनेक देशांत लॉकडाऊन सुरू आहे. संपूर्ण मानवजात कोरोनाच्या प्रभावाखाली असताना निसर्गाने मात्र अनेक चमत्कार दाखवायला सुरुवात केली आहे. गंगेपासून पंचगंगेपर्यंत अनेक नद्यांच्या प्रदूषणात घट झाली आहे. हवा स्वच्छ असल्याने दूरवरच्या पर्वतरांगा स्पष्ट दिसत आहेत. मात्र, समाजाच्या डोक्यात कोरोना सोडून दुसरे काही नसल्याने अनेक निसर्गातील चमत्कार आणि आविष्कार पाहायला आपण मुकलो आहोत.

प्रदूषण कमी झाले. आकाश निरभ्र होते. त्यामुळे एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यात एक अवकाश स्थानक आकशात फिरताना स्पष्टपणे दिसले. दिनांक बारा एप्रिलला तर अगदी चार मिनिटे इतका वेळ ते शुक्राजवळून जाताना पाहायला मिळाले. एरव्हीच्या आकाशात हे पाहता येणे शक्यच नव्हते. तर सव्वीस एप्रिलला चंद्र आणि शुक्र शेजारी शेजारी बसलेले पाहून कुसुमाग्रजांच्या 'पृथ्वीचे प्रेमगीत' या कवितेतील पृथ्वीवर एकतर्फी प्रेम करणारे हे दोन प्रेमवीर आपले दु:ख, सहवेदना एकमेकांना सांगत आहेत, असे वाटले. तर 'नासा'च्या हवाल्याने एक बातमी अशी आली आहे की, २९ एप्रिल २०२० पर्यंत ओआर-२ नावाचा लघुग्रह पृथ्वीच्या अगदी जवळून म्हणजे १८ लाख किलोमीटरवरून जाणार आहे. अनेकांनी याच्या विपर्यास्त बातम्या प्रसिद्ध केल्या होत्या. पृथ्वीवर म्हणे, या लघुग्रहाने विनाश घडणार होता. मात्र, त्यापेक्षा एक मोठा आणि गंभीर धोका या वसुंधरेला निर्माण झाला होता. संशोधकांच्या तो लक्षात आला होता. अनेक सुजाण विज्ञानप्रेमी या धोक्यामुळे अस्वस्थ झाले होते. आता तो धोका टळला आहे. मात्र, त्याबाबत चिंतन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

पृथ्वी कशी आहे ते आपणास माहीत आहे. जमीन आणि पाण्याने पृथ्वीचा पृष्ठभाग व्यापलेला आहे. जमिनीवर मानवासह असंख्य प्राण्यांचे वास्तव्य आहे. आपण सर्व भूपृष्ठावर राहणारे प्राणी, पक्षी आणि वनस्पती हवेच्या महासागराच्या तळाशी राहतो, असे टोरिसेली यांनी सतराव्या शतकातच सांगितले होते. हा हवेचा महासागर त्याच्या पृष्ठभागाजवळ म्हणजेच पृथ्वीपासून साधारणत: १५ ते ३५ किलोमीटर अंतरावर ओझोनचा एक थर धरून ठेवतो. ओझोनचा रेणू तीन ऑक्सिजन अणूंचा बनतो. आपण प्राणवायू म्हणून घेतो तो ऑक्सिजन दोन ऑक्सिजन अणूंचा रेणू असतो. हा ओझोनचा थर वातावरणात असल्यानेच जीवसृष्टी तग धरून आहे. हा थर सूर्यापासून येणारी अतिनील किरणे पृथ्वीपर्यंत पोहोचू देत नाही. एका अभ्यासानुसार, अतिनील किरणांमध्ये दहा टक्के वाढ झाल्याने त्वचेच्या कर्करोगाचे पुरुषांमध्ये १९ टक्के आणि स्त्रियांमध्ये १६ टक्के प्रमाण वाढते. चिलीमध्ये झालेल्या अभ्यासात हेच प्रमाण ४६ टक्क्यांनी वाढत असल्याचे लक्षात आले. हा थर धोक्यात आल्यास डोळ्याच्या मोतीबिंदूच्या तक्रारीही वाढतील. याचा पिकावरही परिणाम अपरिहार्य आहे. ही किरणे जर पृथ्वीपर्यंत आली, तर संपूर्ण जीवसृष्टी होरपळून जाईल. या सजीवसृष्टी रक्षक ओझोन थराला मागील महिन्यात एक छिद्र पडले होते.

दरवर्षी असे छिद्र पडलेले संशोधकांना दिसते. मात्र, ते दक्षिण ध्रुवावरील अंटार्क्टिका सागरावर असते. हे छिद्र साधारणत: दोन ते अडीच दशलक्ष चौरस किलोमीटर इतके मोठे असते. उत्तर ध्रुवावर आर्क्टिक सागरावर सर्वत्र बर्फाची चादर पसरलेली असते. या भागात ओझोन थराला दहा लाख चौरस किलोमीटरचे छिद्र पडलेले आढळून आले. ओझोन थराचे छिद्र कमी करण्यामध्ये ढग, क्लोरोफ्लोरोकार्बन आणि हायड्रोफ्लोरोकार्बनची मोठी भूमिका असते. जेव्हा अतिनील किरणे पृथ्वीच्या जवळ येतात, तेव्हा क्लोरिन आणि ब्रोमिनचे अणू या रेणूतून बाहेर पडतात. ते ओझोनमधील ऑक्सिजन अणूंशी संयोग पावतात. त्यामुळे ओझोन थर पातळ होतो. प्रदूषणामुळे या प्रक्रियेत भरच पडते आणि ओझोन थराला धोका वाढतो. यामुळे उत्तर ध्रुवावर ओझोन थर पातळ होतो. वसंत ऋतूमध्ये ओझोनचा साधारणत: सत्तर टक्के भाग पातळ होतो. काही ठिकाणी छिद्र पडते. मात्र, उत्तर ध्रुवावर असे छिद्र प्रथमच पडले आणि विज्ञानविश्वाला मोठा धक्का बसला. त्यामुळे १९८७ मध्ये माँट्रिएल करार करण्यात आला त्यावेळेपासून क्लोरोफ्लोरोकार्बनच्या उत्सर्जनावर बंदी घालण्यात आली आणि ओझोन थराचा धोका कमी करण्यात आला. त्यावेळेपासून दक्षिण ध्रुवावर हे छिद्र दिसते. मात्र, त्याची व्याप्ती कमी असते. सर्वात महत्त्वाचे उत्तर ध्रुवावर प्रथमच हे घडत होते.


यावर्षी उत्तर ध्रुवावरील तापमान हे नेहमीपेक्षा खूप कमी झाले होते. तसेच या भागात मोठ्या प्रमाणात ढग तयार झाले होते. त्यातून ओझोन थरासाठी धोकादायक असणारे घटक आल्याने हा धोका निर्माण झाला. कोपर्निकस सेंटियल-५पी या उपग्रहाच्या सहाय्याने प्राप्त माहितीतून ही गोष्ट लक्षात आली. जर हे छिद्र असेच राहिले, तर बर्फ मोठ्या प्रमाणात वितळून समुद्रातील पाण्याची पातळी मोठ्या प्रमाणात वाढली असती. यामध्ये समुद्रकिनारी असणारी अनेक मोठी शहरे आणि छोट्या वस्त्या समुद्रात बुडून गेल्या असत्या. त्या भागात असणाऱ्या सजीवसृष्टीला मोठा धोका निर्माण झाला असता. अनेकांना कर्करोगासारख्या आजाराला बळी पडावे लागले असते. त्यामुळे अनेक संशोधक या छिद्राच्या हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवून होते.

मात्र, आजवरच्या इतिहासातील सर्वात मोठे उत्तर ध्रुवावरील हे छिद्र हळूहळू कमी होत गेले. हे कसे घडले याचा अभ्यास करताना संशोधकांनी मोठा खुलासा केला आहे. कोरोना आला. त्याने जगभर विनाश सुरू केला आणि त्याच्या भीतीने लॉकडाऊन झाले. सर्व कारखाने, उद्योगधंदेच नाही, तर वैयक्तिक वाहनांचा वापर अगदीच कमी झाला. वातावरणातील प्रदूषण कमी झाले आणि एका संकटाने दुसरे संकट दूर केले. प्रदूषण कमी झाल्यामुळे हे छिद्र भरले असल्याचे संशोधकांचे म्हणणे आहे. मात्र, यापुढे प्रदूषण कमी करण्यासाठी विशेष प्रयत्न करायला हवेत. प्रदूषण कमी नाही केले, तर हा धोका पुन्हा पुन्हा उद्‌भवू शकतो. त्यामुळे आता प्रदूषण कमी करण्यावर भर देण्याव्यतिरिक्त पर्याय नाही. कोपर्निकस संस्थेचे वैज्ञानिक विन्सेंट हेन्री यांच्या मते, ओझोनला पडणारी छिद्रे ही अनेक संशोधकांच्या अभ्यासाचा विषय आहेत. प्रदूषण कमी नाही झाले, तर असे एखादे छिद्र भविष्यात न बुजता ते वाढत राहील आणि संपूर्ण मानवजातीलाच नव्हे, तर जीवसृष्टीला धोका निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. वातावरणातील क्लोरिन आणि ब्रोमिनचे प्रमाण कमी केल्याशिवाय पर्याय नाही. आपण सर्वांनी प्रदूषण कमी करणारी जीवनशैली आपलीशी करणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

# परीक्षा तीन सत्रांत घेण्याचा विचार

## समितीची ऑनलाईन बैठक; अनुषंगिक बाबींवरही चर्चा

**सकाळ वृत्तसेवा**



कोल्हापूर, ता. २ : विद्यापीठाच्या सर्व प्रलंबित परीक्षा तीन सत्रांमध्ये घेण्याबाबतचा विचार आज परीक्षा समितीच्या बैठकीत करण्यात आला. प्रश्नपत्रिका आणि उत्तरपत्रिका यांचे निर्जंतुकीकरण, सोशल डिस्टन्सिंग कसे करता येईल, यावरही चर्चा झाली. सकाळी अकरा ते दुपारी दीड या वेळेत ऑनलाईन पद्धतीने बैठक झाली.

कोरोनाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी विद्यापीठांच्या परीक्षा पुढे ढकलल्या. परीक्षा जुलैमध्ये होतील, असा अंदाज आहे. त्या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठाने एक स्वतंत्र परीक्षा समिती नेमली आहे. समितीची पहिली बैठक आज ऑनलाईन झाली. त्यात २७ प्रतिनिधी सहभागी झाले होते. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी समितीचा उद्देश सांगितला. समितीकडून विद्यापीठाला

**पान ६ वर »**

> **परीक्षा घेण्यासंदर्भात प्रत्येकाने विचार मांडले. बैठकीत जबाबदाऱ्यांची निश्चिती झाली. राज्य समितीच्या मार्गदर्शक सूचना आल्यानंतर परीक्षेचे स्वरूप व वेळापत्रक ठरेल.**
>
> **- डॉ. डी. जी. कणसे**, प्राचार्य

पुढारी

# परीक्षा तीन सत्रांत घेण्याबाबत चर्चा

## १९ सदस्यीय समितीची ऑनलाईन बैठक; लवकरच वेळापत्रक बनविण्याचा निर्णय

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यापीठाच्या सर्व प्रलंबित परीक्षा तीन सत्रांमध्ये घेण्याबाबतची चर्चा विद्यापीठातर्फे नियुक्त परीक्षा समितीच्या बैठकीत झाली. कोरोना व पावसाळ्यातील पूरपरिस्थतीबरोबरच प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका यांचे निर्जंतुकीकरण, सोशल डिस्टन्ससिंग, कसे करता येईल याबाबत बैठकीत प्रतिनिधींनी मते मांडली.

कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे घोषित करण्यात आलेल्या लॉकडाऊनमुळे विद्यापीठाच्या परीक्षा रखडल्या आहेत. यूजीसीने याबाबत एक समिती नेमली असून काही शिफारसी सादर केल्या आहेत. त्याअनुषंगाने शिवाजी विद्यापीठाने तज्ज्ञ,



**शिवाजी विद्यापीठातून...**

अनुभवी लोकांची १९ सदस्यीय एक समिती गठीत केली आहे. या समितीची पहिली बैठक शनिवारी ऑनलाईन झाली. यात २७ प्रतिनिधी सहभागी झाले होते. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी समितीचा उद्देश सांगितला. समितीकडून विद्यापीठाला अपेक्षित कामाबाबत कुलगुरूंनी मार्गदर्शन केले. त्यानंतर प्रत्येकाची समितीमधील जबाबदारी निश्चित करण्यात आली.

> विद्यापीठाच्या परीक्षा विषयक समितीची पहिली बैठक सकारात्मक झाली आहे. परीक्षा व शैक्षणिक वार्षिक नियोजनाबाबत सर्वांनी सकारात्मक मते नोंदवली. बैठकीत प्रत्येक घटकाची जबाबदारी निश्चिती करण्यात आली आहे. केंद्र व राज्य सरकारच्या मार्गदर्शक सूचनानुसार कामकाज करण्याचे ठरले आहे. त्यानुसार परीक्षेचे स्वरूप व वेळापत्रक ठरविण्यात येईल.
> 
> **- प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे,** अध्यक्ष, परीक्षा समिती

विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचा आढावा घेण्यात आला. जुलै महिन्यात काही भागांत पूरस्थितीचा धोका संभवतो, त्या अनुषंगाने उपाय योजना व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षा ऑनलाईन घेण्याबाबत बैठकीत चर्चा झाली. कोरोना आणि पूरपरिस्थिती याचा विचार करून विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा विचार करण्यात आला. राज्य समितीच्या मार्गदर्शक सूचना आल्यानंतर पुढील आठवड्यात बैठक घेण्यात येईल. त्यानंतर विद्यापीठ परीक्षांचे नवे वेळापत्रक बनविण्याचे ठरले आहे. यावेळी प्रकुलगुरू डॉ डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांच्यासह समिती सदस्य उपस्थित होते.

### सोशल डिस्टन्सिंग पाळून परीक्षा घेण्याचा विचार

सोशल डिस्टन्सिंग पाळून विद्यापीठाच्या परीक्षा तीन सत्रांत घेता येतील का, याचा विचार बैठकीत झाला. सकाळी ९ ते ११, दुपारी १२ ते १, आणि ३ ते ५ या वेळांमध्ये परीक्षा घेण्याबाबत प्रतिनिधींनी मते मांडली. परंतु, अद्याप यावर ठोस निर्णय झालेला नाही.

लोकमत

# विद्यापीठीय परीक्षा तीन सत्रांत घेण्याचा विचार

## शिवाजी विद्यापीठात बैठक :परीक्षा वेळापत्रक निश्चितीवर चर्चा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** परीक्षा हॉल, प्रश्नपत्रिका आणि उत्तरपत्रिका यांचे निर्जंतुकीकरण करणे, सोशल डिस्टन्सिंगद्वारे परीक्षा कशा घेता येईल. प्रलंबित परीक्षा तीन सत्रांमध्ये घेण्याबाबतची चर्चा शनिवारी झालेल्या विद्यापीठाच्या शैक्षणिक सत्र व परीक्षा वेळापत्रक निश्चिती समितीच्या बैठकीत करण्यात आली. ऑनलाईन पद्धतीने झालेल्या बैठकीत कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्यासह २७ जणांचा सहभाग होता.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाचे शैक्षणिक सत्र पुढे सरकले आहे. अनेक परीक्षा प्रलंबित आहेत. शिवाजी विद्यापीठाकडून नवीन शैक्षणिक सत्र आणि परीक्षांच्या वेळापत्रक निश्चितीच्या प्रक्रियासाठी समिती नियुक्त केली आहे. या समितीची पहिली बैठक ऑनलाईन पद्धतीने झाली.

प्रारंभी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचा आढावा घेण्यात आला. समितीचा उद्देश सांगितला. त्यानंतर प्रत्येकाची समितीमधील जबाबदारी निश्चित करण्यात आली. तसेच त्यांनी काय काम करणे अपेक्षित आहे ते देखील सांगण्यात आले. तसेच जुलै महिन्यात काही भागात पूरस्थितीचा धोका संभवतो त्या अनुषंगाने ही उपाययोजनांची चर्चा बैठकीत करण्यात आली. राज्य समितीच्या मार्गदर्शक सूचना आल्यानंतर नवे वेळापत्रक बनवण्याची बैठकीत चर्चा करण्यात आली.

> सर्व सदस्यांनी चर्चेमध्ये सहभाग घेतला व सकारात्मक मते मांडली. शिवाजी विद्यापीठाच्या शैक्षणिक व परीक्षा नियोजनासाठी सहकार्य करण्याचे ठरविण्यात आले. कोरोना व जुलै महिन्यातील पूरपरिस्थिती या पार्श्वभूमीवर सर्व विद्यार्थी, प्राध्यापक, सेवक, पदाधिकारी यांच्या सुरक्षिततेची चर्चा करण्यात आली. ही चर्चा प्राथमिक टप्प्यामध्ये होती, अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही.
>
> **प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे,** अध्यक्ष, विद्यापीठाच्या शैक्षणिक सत्र व परीक्षा वेळापत्रक निश्चिती समिती.

यावेळी काही अभ्यासक्रमाचे ऑनलाईन पद्धतीने परीक्षा घेता येतील का?, तसेच सोशल डिस्टन्सिंग ठेवून परीक्षा कशाप्रकारे घेता येतील. यामध्ये सकाळी ९ ते ११, दुपारी १२ ते १ आणि ३ ते ५ या वेळांमध्ये पेपर घेण्याचा विचार झाला असून, अद्याप निर्णय झालेला नाही.

यावेळी समितीचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांच्यासह समिती सदस्य उपस्थित होते.

# विद्यापीठाच्या परीक्षा तीन सत्रात?

## परीक्षा समितीचा ऑनलाईन बैठकीत विचार : जुलैमध्ये परीक्षा घेण्याचा प्रस्ताव

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा घेण्यासाठी नेमण्यात आलेल्या समितीची पहिली बैठक शनिवारी ऑनलाईन पद्धतीने झाली. सर्व प्रलंबित परीक्षा तीन सत्रांमध्ये घेण्याबाबतचा विचार यावेळी मांडण्यात आला. याबाबत पुढील बैठकीमध्ये शिक्कामोर्तब होऊन परीक्षांचे वेळापत्रक जाहीर करण्यात येईल, अशी माहिती सूत्रांनी दिली.

कोरोना विषाणू संसर्ग रोखण्यासाठी विद्यापीठांच्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या. या परीक्षा जुलैमध्ये होतील असा अंदाज आहे. त्या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठाने एक स्वतंत्र परीक्षा समिती नेमली आहे. समितीची पहिली बैठक ऑनलाईन पद्धतीने झाली. यामध्ये



२७ प्रतिनिधी सहभागी झाले होते. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी समितीचा उद्देश सांगितला. समितीकडून विद्यापीठाला अपेक्षित असणाऱ्या कामाबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले. प्रत्येकाची समितीमधील जबाबदारी निश्चित करण्यात आली. विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचा आढावा घेण्यात आला. जुलै महिन्यात काही भागात पूरस्थितीचा धोका संभवतो. त्या अनुषंगानेही उपाययोजनांची चर्चा बैठकीत करण्यात आली. राज्य समितीच्या मार्गदर्शक सूचना आल्यानंतर नवे वेळापत्रक बनवण्याचे बैठकीत ठरविण्यात आले.

यावेळी समितीचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे, प्रकुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांच्यासह समिती सदस्य उपस्थित होते.

### तीन सत्रातील परीक्षा विचाराधीन

सोशल डिस्टन्सिंग पाळता यावे यासाठी तीन सत्रात परीक्षा घेण्याचा विचार पुढे आला आहे. यावर बैठकीत चर्चा झाली. सकाळी ९ ते ११, दुपारी १२ ते २, आणि ३ ते ५ या वेळांमध्ये पेपर घेण्याचा विचार झाला असून अद्याप अधिकृत निर्णय झाला नसल्याचे सूत्रांनी सांगितले.

तरुण भारत Sun, 03 May 2020
https://epaper.tarunbharat.com/c/51543292

# वेगवेगळ्या वर्गांची परीक्षा घ्या

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

## विद्यापीठ समितीची बैठक; राज्याच्या निर्णयाकडे लक्ष

करोनाच्या संकटामुळे लांबणीवर पडलेल्या महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय परीक्षा तीन सत्रांमध्ये घेण्याबाबतचा विचार सुरू आहे. दिवसभरात वेगवेगळ्या वर्गांचे तीन पेपर घेऊन कमीत कमी कालावधीत जास्तीत जास्त अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे नियोजन करण्याविषयी प्राथमिक चर्चा झाली. मात्र, यासंदर्भात अंतिम निर्णय झाला नाही. विद्यापीठीय परीक्षांच्या नियोजनाबाबत प्रशासनाने १८ सदस्यीय समितीची स्थापना केली आहे. समितीची पहिली ऑनलाइन बैठक शनिवारी झाली.

विद्यापीठाच्या समितीची शनिवारी झालेल्या ऑनलाइन चर्चेत परीक्षेच्या अनुषंगाने सदस्यावर वेगवेगळ्या जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्रकुलगुरू डी. टी. शिर्के, कुलसचिव विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे, आणि परीक्षा समितीचे प्रमुख प्राचार्य धनाजी कणसे यांच्यासह सदस्यांची ऑनलाइन चर्चा झाली. यूजीसीने नेमलेल्या समितीने एक जुलैपासून परीक्षा घेण्याविषयीची शिफारस केली आहे. मात्र, कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यातील कराड भागात जुलैमध्ये पुराची स्थिती उद्भवते याकडेही काही सदस्यांनी लक्ष वेधले.

लांबलेल्या परीक्षांचे वेळापत्रक बनविताना दिवसभरातील तीन सत्रांत परीक्षा घेण्याची सूचना सदस्यांनी केल्या. तीन वेगवेगळ्या वर्गांचे तीन सत्रात पेपर घेतल्यास ते सोयीचे ठरेल अशी मते सदस्यांनी मांडली. सकाळी नऊ ते ११, दुपारी बारा ते एक आणि दुपारी तीन ते पाच या वेळेत पेपर घेता येऊ शकतो. चर्चेमध्ये डॉ. आर. जी. कोरबू, डॉ. एच. एन. मोरे, डॉ. पी. आर. शेवाळे, मेघा गुळवणी, डी. के. मोरे, अरुण पाटील, एस. एस. पाटील, अवनिश पाटील, पी. व्ही. अनघुले आदींनी सहभाग घेतला.

'समितीच्या पहिल्याच बैठकीत विविध अभ्यासक्रमांविषयी आढावा घेतला' असे समितीचे प्रमुख प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांनी सांगितले.

# तुकडोजी महाराजांना विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, समाजशास्त्र अधिविभागाचे डॉ. प्रल्हाद माने उपस्थित होते.

Kolhapur Edition
3 May, 2020 Page No. 1
Powered by : erelego.com

# परीक्षा तीन सत्रांत घेण्याचा विचार

» पान १ वरून

अपेक्षित असणाऱ्या कामाबाबतही कुलगुरूंनी मार्गदर्शन केले. त्यानंतर प्रत्येकाची समितीमधील जबाबदारी निश्चित करण्यात आली. त्यांनी काय काम करणे अपेक्षित आहे, ते देखील सांगण्यात आले. विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचा आढावा घेण्यात आला. जुलैमध्ये काही भागात पूरस्थितीचा धोका संभवतो. त्याबाबत उपाययोजनांची चर्चाही बैठकीत झाली. राज्य समितीच्या मार्गदर्शक सूचना आल्यानंतर नवे वेळापत्रक बनवण्याचे ठरविण्यात आले. समितीचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांच्यासह समिती सदस्य सहभागी होते. सोशल डिस्टन्सिंग पाळता यावे, यासाठी तीन सत्रांत परीक्षा घेता येईल का, याचा विचार बैठकीत करण्यात आला. यामध्ये सकाळी नऊ ते अकरा, दुपारी बारा ते एक आणि तीन ते सायंकाळी पाच या वेळांमध्ये विचार झाला; मात्र त्यावर अंतिम निर्णय झालेला नाही.

# विद्यापीठाच्या 'कोविड-१९' प्रश्नमंजुषा स्पर्धेला प्रतिसाद

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाकडून ऑनलाईन सुरू असलेल्या 'कोविड-१९" प्रश्नमंजुषा स्पर्धेला भारत, ऑस्ट्रेलिया, नेदरलँड, नेपाळ आदी देशातून प्रतिसाद मिळत आहे. शिवाजी विद्यापीठाचे प्रमाणपत्र मिळत असल्याचा प्रत्येक स्पर्धकाला आनंद होत आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून हे प्रमाणपत्र व्हायरल करून आपला आनंद द्विगुणीत केला जात आहे. स्पर्धेला चार लाखांपेक्षा जास्त स्पर्धकांनी सहभाग नोंदवत विद्यापीठाचे प्रमाणपत्र मिळवले आहे. स्पर्धा लॉकडाऊन संपेपर्यंत राहणार आहे.

कोविड-१९ विषाणूमुळे उद्भवणारा कोरोना रोग संसर्गजन्य आहे. सर्वसामान्यांमध्ये या आजाराविषयी जनजागृतता निर्माण व्हावी, त्यांना या आजाराबद्दल माहीत असलेल्या ज्ञानामध्ये भर टाकावी, या दृष्टीने 'कोविड-१९" प्रश्नमंजुषा स्पर्धा हा उपक्रम विद्यापीठाने सुरू केला आहे. स्पर्धकांनी ऑनलाईन सोडवलेल्या प्रश्नांच्या उत्तरातून कोविड-१९ संदर्भात आपले ज्ञान किती बरोबर



**सोशल मीडियावर व्हायरल केले जातेय प्रशस्तिपत्र**

आहे, याची पोचपावतीही प्रमाणपत्राच्या स्वरूपात स्पर्धकांना मिळते. त्यामुळे कोविड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी हा उपक्रम प्रभावी ठरणार आहे.

कोविड-१९ प्रश्नमंजुषा स्पर्धेतील प्रश्न जनजागृती करणारे असल्याने ही परीक्षा देण्यास लोकांची पसंती आहे. प्रश्न सोडवून कोविड-१९ बद्दलच्या आपल्या ज्ञानाची चाचपणी स्पर्धक करीत आहेत. विद्यार्थीच नव्हे तर कोणीही ही परीक्षा देवू शकते. शिक्षण किंवा वयाची अट नसल्याने लहान मुलांपासून ते अबालवृध्दापर्यंत ही परीक्षा चर्चेचा विषय बनली आहे. विद्यापीठ प्रशासनाने ऑनलाईन डेटा एकत्रित करून ठेवला आहे.

तरुण भारत Sun, 03 May 2020
https://epaper.tarunbharat.c